27 OCT 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नाईट इचलकरंजी, एमजीएम कराडची विजयी सलामी

## शिवाजी विद्यापीठ इंटर झोनल महिला खो—खो स्पर्धेस प्रारंभ

प्रतिनिधी
इचलकरंजी

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत इंटर झोनल महिला खो–खो स्पर्धेचे उद्घाटन जयहिंद मंडळ येथे झाले. उद्घाटन सामना एस. जी. एम. कराड विरुद्ध जी. ए. कॉलेज सांगली यांच्यात खेळविण्यात आला. या सामन्यात एस. जी. एम.च्या संघाने सुरुवातीपासून सामन्यावर वर्चस्व राखत जी. ए. सांगली संघाला १ डाव ०४ गुणांनी पराभव करीत विजयी सलामी दिली. तर एम. जी. कन्या महाविद्यालय सांगली व एस. के. एम. कॉलेज देऊर या संघात खेळविण्यात आलेल्या सामन्यात एम. जी. कन्या संघाने प्रतिस्पर्धी संघावर १ डाव ०५ गुणांनी विजय मिळविला. या संघाबरोबरच के. आर. पी. कन्या इस्लामपूर तसेच नाईट कॉलेज इचलकरंजी संघांनी आपल्या प्रतिस्पर्धी संघावर मात करीत स्पर्धेत पुढे घोडदौड चालू ठेवली.



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ इंटर झोनल महिला खो–खो स्पर्धेत महिला खो–खो स्पर्धेचे उद्घाटन जयहिंद मंडळ येथे झाले. उद्घाटन सामना एसजीएम कराड विरुद्ध जीए कॉलेज सांगली यांच्यात झाला. याप्रसंगी खेळाडूंसमवेत प्रमुख पाहुणे.

स्पर्धेचे आयोजन देशभक्त बाबासाहेब भा. खंजिरे शिक्षण संस्थेच्या नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी, रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी हेरिटेज व रोटरी क्लब इनरव्हील यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

दरम्यान, स्पर्धेचे उद्घाटन रोटरी क्लब ऑफ इचलकरंजीचे प्रेसिडेंट संजय घायतिडक, इंडस्ट्रियल इस्टेटचे चेअरमन राहुल खंजिरे, देशभक्त बा. भा. खंजिरे संस्थेचे अध्यक्ष अरुण खंजिरे, रोटरी क्लब इचलकरंजी हेरिटेजचे प्रेसिडेंट नवीत धनधानिया, इनरव्हील क्लबचे इशा खंडेलवाल, सेक्रेटरी माधुरी लाहोटी यांच्या हस्ते पार पडला.

स्पर्धमध्ये सांगली, सातारा व कोल्हापूर या तीन जिल्ह्यातील पहिला चार क्रमांकाचे महिलांच्या प्रत्येकी १२ संघात स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेमधून नांदेड येथे होणाऱ्या अश्वमेध महाराष्ट्र राज्य क्रीडा स्पर्धेसाठी तर एसएनडीटी युनिर्व्हसटी, मुंबई तसेच सी.आर.एस. युनिर्वसटी, जिंद, हरीयाना येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो–खो स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघातील महिला खेळाडूंची निवड केली जाणार आहे. स्पर्धेमध्ये वैयक्तिक चाचणीसाठी आलेल्या खेळाडूसह एकूण २०० महिला खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धा दिवस–रात्र अशा दोन सत्रात विद्युतझोतात खेळविली जाणार आहे. स्पर्धेचा बक्षीस समारंभ सोमवार २७ रोजी सायंकाळी ६ वाजता मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. विरुपाक्ष खानाज यांनी केले. आभार डॉ. देवेंद्र बिरनाळे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सौरभ पाटणकर यांनी केले.